# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/477/2026 Dt : 11/08/2026

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषयः— दिनांक ९ ते १७ ऑगस्ट २०२६, कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना मार्फत स्वातंत्र्यदिन — २०२६ साजरा करणे आणि हर घर तिरंगा मोहिम राबविण्याबाबत.**

**संदर्भः— १) F.No.P/24/ NSS /DTE/2026/441-456,Dt.7 Augest,2026 मा. रासेयो केंद्रीय संचालक, नवी दिल्ली यांचे ऑनलाईन पत्र.**
**२) रासेयो —२०२६/प्र.क्र.७४/रासेयो कक्ष, दिनांक १०/०८/२०२६ चे ई—मेल पत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय या प्रमाणे आहे कि, संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये मा. रासेयो केंद्रीय संचालक, युवा कार्य व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार सुचित करण्यात येते की, देशभक्ती, राष्ट्रीय अभियान आणि राष्ट्रध्वजाप्रती आदर वाढवण्यासाठी स्वातंत्र्यदिन सोहळयाचा एक भाग म्हणून दरवर्षी हर घर तिरंगा मोहिम राबवली जाते. या मोहिमेची चौथी आवृत्ती दिनांक ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संपूर्ण देशभरात राबवली जाणार आहे.

विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने मार्फत स्वातंत्र्यदिन —२०२६ अत्यंत भव्य आणि योग्य अशा प्रकारे साजरा केला जाईल याची खात्री करावी. या उत्सवांचे नियोजन करताना रासेयो स्वयंसेवक, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक समुदाय यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यात यावा. तसेच, विद्यापीठ, महाविद्यालये आणि स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत योग्य उपक्रम आयोजित करण्यात यावेत. यामध्ये स्वातंत्र्यदिनापूर्वीच्या उपक्रमांचा (उदा. तिरंगा रॅली, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, प्रतिज्ञा समारंभ, तिरंग्यासोबत सेल्फी, स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण मोहीम स्वातंत्र्यसैनिकांना श्रध्दांजली, जनजागृती मोहिम आणि इतर समुदाय आधारीत उपक्रम) समावेश असावा.

या मोहिमेतंर्गत आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल nnssdsdgug@gmail.com या ई—मेल वर सादर करावे.

धन्यवाद!

डॉ. श्याम खंडारे
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**